"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"- शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे
SHRI SWAMI VIVEKANAND SHIKSHAN SANSTHA, KOLHAPUR'S
**Smt. Meenalben Mehta College, Panchgani**
(Arts, Commerce & Science) Tal. Mahabaleshwar, Dist.Satara.412805 (M.S.)
**श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज, पांचगणी**
(कला, वाणिज्य व विज्ञान) ता. महाबळेश्वर, जि. सातारा.

Estd : June 1990
NACC Reaccreditation : "B" Grade

AFFILIATED TO SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Ph (Off.) 02168-240667 (Prin.) 02168-299304
Mob: 9423035675
e-mail : smt.meenalbenmehtac@yahoo.com
web : smtmmcollege.org

| Founder | President | Chairman | Secretary | I/C Principal |
|---|---|---|---|---|
| Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe<br>B.A ; B.T ; D.Lit. | Hon.Chandrakant (Dada) Patil<br>M.L.A., Ex. Revenue Minister, Maharashtra State | Hon.Prin.Abhaykumar Salunkhe<br>M.A. | Hon.Prin. Mrs.Shubhangi Gavade<br>; M.Sc B.Ed. | Prof. Dr. Satish Desai<br>M.A ; Ph.D. |

Outword No. : SMMCP /......./.........

Date:

## Goals and Mission of the College:

**The College is governed by the management named 'Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur.' The motto of the management is "Dissemination of Education for Knowledge, Science and Culture"** (ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार)

**In tune with the motto of the management, the college has set the following vision and mission:**

**Goals and Mission of the College:**


- **To spread higher education in the hilly, rural and neglected area of the Jaoli and Mahabaleshwar Valley.**
- **To inculcate among the students social values like honesty, truth, service, and sacrifice, and to stop social exploitation.**
- **To develop all-round personality of the students.**
- **To bring about the progressive change in the society by means of education.**
- **To create the sense of equality among the students.**
- **To mould selfless social workers who will strive ceaselessly for the cause of social reform.**

SMT MEENALBEN MEHTA COLLEGE PANCHGANI
Office
ARTS COMMERSE & SCIENCE

प्रभारी प्राचार्य
श्रीमती मीनलबेन मेहता कॉलेज,पांचगणी
(कला,वाणिज्य व विज्ञान)
ता.महाबळेश्वर,जि.सातारा

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।। -शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे.

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**





*Vision Mission*

SMT. MEGHALBEN MEHTA COLLEGE PANCHGANI Office ARTS, COMMERSE & SCIENCE

# *AIMS*

*Education For Knowledge, Science and Refined Culture.*

- To inculcate in life the basic values such as truth, honesty character, anti-exploitation spirit, love, social service and sacrifice.
- To insist on sanctity and coordination of thought, expression and practice.

# *Objectives*

There shall be no discrimination on the grounds of caste, creed, race and religion in the institution and in all its branches.

The institution shall be apolitical

The members of the management will practise simplicity and frugality in their life.

Accounts of all the branches will be transparent and kep topen for all.

To motivate and inspire people to be spontaneous and devoted social workers for develoment of society.

A new education system will be evolved through ideal life-style of the teacher-activists as was the practice in ancient Gurukul system and thereby promote lasting values such as sacrifice, honesty, truth, equality and fraternity,


To develop potentials of creativity and independent thinking,

To confess misappropriation of public funds if you owe it to the institution.

Powered By Dream Computer (http://www.dreamindia.net)

E-Visitors Count : 2726092

SMT MEENALBEN MEHTA COLLEGE PANCHGANI
Office
ARTS COMMERSE & SCIENCE



# ध्येय धोरण

**ज्ञान, विज्ञान आणि सुंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार**

**सत्य, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, सेवा आणि त्याग या मौलिक निष्ठा जीवनात उतरविण्याचा प्रयत्न करणे हा सुसंस्कारी शिक्षणाचा हेतू राहील.**

**आचार, विचार आणि उच्चार यांच्या पावित्र्यावर आग्रहपूर्वक भर देणे.**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

# संस्थेची उद्दिष्टे

१) सामान्य समाजात सुसंस्कारी शिक्षणप्रसाराच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणणे.

२) सत्य, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, सेवा व त्याग या मौलिक निष्ठा जीवनात उतरविण्याचा प्रयत्न करणे, हा सुसंस्कारी शिक्षणाचा हेतू राहील.

३) कला, वाणिज्य, शास्त्र, शेती, समाजशास्त्र, विधी, तंत्र आणि शारीरिक शिक्षण आदी विषयांचा समावेश होणारे परिणामकारक प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण यांद्वारा सामाजिक संस्कृतीचा विकास साधणे.

४) सामान्य समाजाच्या सुसंस्कार विकासाच्या ध्येयासाठी उत्स्फुर्तपणे वाहून घेणारे आदर्श समाजसेवक निर्माण करणे.

५) आचार-विचार आणि उच्चार यांच्या पावित्र्यावर आग्रहपूर्वक भर देणे.

६) संस्थेच्या शाखा व उपशाखांतून जात, धर्म, पंथ अथवा वर्ण भेदभाव मानला जाणार नाही.

७) संस्था राजकारणापासून अलिप्त राहील.

८) प्राचीन काळातील गुरूपरंपरेला धरून शिक्षक-कार्यकर्ते यांच्या आदर्श जीवनाच्या धड्यातून नवीन शिक्षण पध्दती निर्माण केली जाईल. जिच्यामुळे आत्मसमर्पण, प्रामाणिकपणा, सत्य समता व बंधुत्व या वृत्तीचा परिपोष होईल.

९) स्वतंत्र विचारवृत्ती, नवनिर्मिती यांची कुवत विकसित करणे.

१०) जीवनात हरघडी साधेपणा व काटकसर यांची जपणूक संस्था करील.

११) संस्थेच्या शाखांचे हिशोब सर्वांना पाहण्यास खुले व उपलब्ध राहतील.

# संस्थेची प्रार्थना

हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे
राम कृष्ण रहीम ख्रिस्त बुद्ध झरतुष्ट्र।

महावीर मानवसंत मानव्याचे दीपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे
वंदुया चरण।

सत्य, शील, प्रामाणिकता,
त्याग पिळवणूकीस आळा
मानव्याचे अधिष्ठान ईशतत्त्व दर्शन।

यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार।
विवेकाच्या आनंदाचा लाभ शिक्षणांत।।

- पूज्य बापूजी साळुंखे

अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वानि देव वयुनानि विद्वान्।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नम उक्तिं विधेम।।

**- ईशावास्योपनिषद्**

SMT MEENALBEN MEHTA COLLEGE PANCHGANI
ARTS COMMERSE & SCIENCE
Office

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था
कोल्हापूर

# बोधचिन्हाचा अर्थ व शैक्षणिक विचार

संस्थेच्या बोध चिन्हामध्ये पाणी, कमळ, पणती, ज्योत, प्रकाश व ॐ आहे.

**पाणी**

पाणी म्हणजे जीवन, त्याचे तरंग म्हणजे उद्यमशीलता आहे.

**कमळ**

कमळ, भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. कमळ हे निर्मळ जीवन याअर्थी वापरले आहे. कमळातील पाकळ्यांवर शिक्षण हा शब्द आहे.

**पणती, ज्योत व प्रकाश**

ही ज्ञानाची प्रतीके आहेत. ज्योतीने ज्योत पेटवावी व विद्येचा प्रसार करावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. पाकळ्यांवर दोन पणत्या आहेत. पण त्यांच्या ज्योतीवर ज्ञान, विज्ञान व सुसंस्कार हे शब्द आहेत. ज्ञान, विज्ञान म्हणजे शिक्षण.

**ॐ**

ज्योतीच्या प्रभेतून ईश्वर वाचक अक्षराची निर्मिती आहे. सुसंस्काराची प्रभा आहे, तेथे ईश्वर दर्शन होणारच !

## ।। प्रार्थनेचा अर्थ ।।

### पहिला टप्पा : ऋग्वेदामधील मंत्र

हा मंत्र ऋग्वेदामधील नामस्मरणाचा मंत्र आहे. नामस्मरण कसे करायचे ? थोर विभूतींची अभिव्यक्ती आपणासमोर निर्माण व्हावी, आपले जीवन विधायक व्हावे, म्हणून नामस्मरण महिमा संतांनी वर्णन केला आहे.

### दुसरा टप्पा : बापूजी रचित प्रार्थना

हा टप्पा डॉ.बापूजी रचित आहे. सुस्वरी आहे. एक लक्षात घ्यावयाचे, पाठ्यक्रम असो, नामस्मरण असो, प्रार्थना असो, स्पष्ट आणि खड्या आवाजात उच्चार महत्वाचा आहे. शब्द उच्चारच वस्तू निर्मिती करतात, असा सिध्दांत वेदकाळी होता. डॉ.बापूजींनी सुरूवातीला संतांची नावे घेतली. हे संत कोण ? कोणत्या धर्माचे? तर सर्व धर्मांचे. त्यातून त्यांचा सर्वधर्मसमभाव दिसून येतो. त्यामुळेच डॉ.बापूजींनी प्रार्थनेत सर्व धर्मांच्या संतांची नावे घेतली आहेत.

### तिसरा टप्पा : ईशावास्योपनिषदामधील मंत्र

बापूजींनी या प्रार्थनेतून राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता प्रस्थापित केली आहे. हा जवळचा, हा दूरचा, हे सर्व माझेच असा स्वार्थी हेतू विद्यार्थ्यांत राहू नये, त्यास संपूर्ण मानवजात वंदनीय असावी, आपपर भाव त्यात राहू नये, ही शिकवण या प्रार्थनेतून डॉ.बापूजींनी दिली आहे. ही प्रार्थना राष्ट्रीय ऐक्यास स्फूर्तीप्रद आहे. शिक्षणाचा हेतू आदर्श नागरिक तयार करणे हा आहे.